**MHKO100001862024**

**नियमीत दिवाणी दावा क्र. १८/२०२४ मधील निशाणी क्र. १७ वर आदेश**

(सुभाना कांबळे वि. मिना कांबळे)

प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत व म्हणणे” आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ३ हिचा विवाह झाला असून ती मुंबई येथे राहण्यास आहे व प्रतिवादी क्र. ४ हा नोकरी निमित्त मुंबई येथे राहण्यास असल्याने व त्याला रजा न मिळाल्याने वकिलांना भेटून माहिती व कागदपत्रे देता आली नाहीत त्यामुळे मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आले. तसेच मुदतीत कैफियत व म्हणणे दयावे लागते याचे ज्ञान त्यांना नाही. प्रतिवादी यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी दिल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३.** वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे त्याच अर्जावर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जास कोर्ट फी लावलेली नाही. मजकूर खोटा आहे. अर्ज मंजूर करणेचा झालेस वादीसाठी रू. ५०००/- कॉस्ट दयावी.

**४.** प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांना दावा समन्सची बजावणी दिनांक ०६/०२/२०२४ रोजी झाली आहे. प्रतिवादी यांनी समन्स बजावणी झाल्यानंतर विहीत मुदतीत कैफियत देणे अपेक्षीत होते. परंतु प्रतिवादी यांनी विहीत मुदतीत त्यांची कैफियत व म्हणणे दिले नसल्याने त्यांच्याविरूध्द दिनांक ०२/०७/२०२४ रोजी कैफियत व म्हणणे नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर काहीअंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

**१)** प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी निशाणी २४ वर दाखल केलेली कैफियत व म्हणणे प्रतिवादी क्र. ३ व ४ यांची कैफीयत व म्हणणे म्हणून स्वीकारण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.05.07 11:39:05 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०६/०५/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज